नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०९/२०२६ (शनिवार)

........................................................................................

## चोरीचा गुन्हा उघड, ४ आरोपी अटक
## स्टिंग केबल आणि वाहनासह ३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा :–** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्या नेतृत्वात दिनांक २५/०९/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांनी उदापूर सोलर प्लांटमधील स्टिंग वायर चोरीचा गुन्हा उघड करून ४ आरोपींना अटक केली आहे.

दिनांक २५/०९/२०२६ रोजी उदापूर येथील सुरक्षारक्षक यांना प्लांट मध्ये काम करणारे तीन इसम हे ट्रॅक्टर–ट्रॉली क्र. एम एच ४० सी क्यु ८७०६ ने संशयीतरित्या प्लांट च्या बाहेर जाताना दिसले. त्यांनी सदर माहीती उदापूर सोलर प्लांटचे सुपरवायझर यांना दिली. सदर माहीती जलालखेडा पोलीसांना प्राप्त होताच त्यांनी तात्काळ घटनास्थळ गाठत नमुद तीन इसमांना विचारपुस केली तसेच ट्रॅक्टर–ट्रॉलीची बारकाईने पाहणी केली असता, ट्रॉलीच्या खाली बनवलेल्या एका लोखंडी बॉक्समध्ये सोलर कंपनीचे १ किलोमीटर लांबीचे स्टिंग केबल वायर दडवून ठेवल्याचे आढळून आले.

**नमुद प्रकरणी जलालखेडा पोलीसांनी १) सहीराम गणपतराम भाटी, वय ५० वर्षे, रा. दुलापूर कैरी, ता. व जि. श्रीगंगानगर, राजस्थान,२) विजयकुमार दिलीपराम मेघवाल, वय ४६ वर्षे, रा. शिवपूर भूताई, ता. व जि. श्रीगंगानगर, राजस्थान,३) छिद्रपाल फूलाराम मेघवाल ,वय ४७ वर्षे, रा. सत्ताखेडा, ता. डबवाली, जि. सिरसा, हरियाणा यांचेविरूध्द कलम ३०३(२), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंदवुन तिन्ही आरोपीतांना अटक केली आहे.**

**सदर गुन्हयाचे तपासादरम्यान जलालाखेडा पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्यावरून आरोपी क्र ४) इंद्राज हनुमान मेघवाल ,वय २२ वर्षे, रा. रामसिंगपूर, ता. विजयनगर, जि. श्रीगंगानगर, राजस्थान याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आरोपी क्र ४ याला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयातील १ किलोमीटर लांबीचे स्टिंग केबल किंमती ७५,०००/— रूपये आणि ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी क्यु ८७०६ सह विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती २,५०,०००/— रूपये असा एकुण ३,२५,०००/— हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास जलालखेडा पोलीस करीत आहेत.**

## अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक २५/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास खात्रीशीर गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा चारगाव येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बजाज डिस्कवर मोसा. क्र. एम.एच.—४०/ए.जी. —८०९० मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता मोहाफुल दारू मिळुन आली. **आरोपी नामे मनोज देवेन्द्र प्रजापती, वय ४० वर्ष, रा. बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर हा अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) ५० लिटर मोहाफुल दारू किंमती ५०००/— रूपये २) बजाज डिस्कवर मोसा. क्र. एम.एच.—४०/ए.जी. ८०९० किंमती ४०,०००/— रूपये, असा एकुण किंमती ४५,०००/—रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचे विरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २५/०९/२०२६ रोजी श्री सागर खर्डे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर येथील पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीता असतांना त्यांना खात्रीशीर गोपनिय माहीती मिळाली की, एक इसम अवैधरीत्या विदेशी दारूची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ प्रराज लिकर्स देशी भट्टी जवळ मौजा बोरगाव कळमेश्वर येथे जावून पाहणी केली असता **आरोपी नामे मुरलीधर दुर्गाजी हटवार, वय ३६ वर्ष, रा. डब्लुसिएल १६ माइनर्स कॉलनी, ता. सावनेर, जि.नागपूर हा त्याचेजवळील थैलीत अवैधरीत्या विदेशी दारूची विक्री करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या १३ निपा किंमती ३०४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर २२ गुन्हे दाखल,

**दिनांक २५/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २२ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन काटोल** येथे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत** ०५ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत** ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १०८०० मिली देशी दारू, २३४० मिली विदेशी दारू, १४८ लिटर मोहाफुल दारू, ०१ मोसा असा एकुण ६२,७१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २६/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.** **नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर १९ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव ०७ आरोपी अशा एकुण १०८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १८ आरोपी अशा एकुण १५१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे २५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २४ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर